प्रत्येक व्यक्तीच्या वाचन, लेखन व बोलण्यातून मराठी भाषा समृद्ध होईल- डॉ. गिरीश मोरे

"मराठी भाषा समृद्ध होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने मराठी भाषेतून/ बोलणे, लिहिणे व वाचणे महत्त्वाचे आहे मराठी ज्ञानपीठाचे दुसरे व्यक्तिमत्व आणि थोर कवी व लेखक कुसुमाग्रज यांच्या जयंती दिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. परंतु जर मराठी भाषा संवर्धन व जतन करायची असेल तर प्रत्येक व्यक्तीचे योगदान महत्त्वाचे आहे" असे विधान राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय रूकडीचे डॉ. गिरीश मोरे यांनी 'माझा मराठीची बोलू कौतुके' विषयावर आयोजित कार्यक्रमात ते श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथे केले. अनेक मोठे कवी, लेखक, मराठी साहित्यिक यांनी मराठी भाषेच्या विकासासाठी खूप मोठे योगदान दिले आहे तसेच मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने आणखीन एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. प्रत्येक व्यक्तीला मराठी भाषेबद्दल अभिमान, प्रेम व आस्था असायलाच हवी तरच मराठी भाषा समृद्ध होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने उपस्थित होते त्यांनी मराठी भाषा एक सुंदर भाषा असून प्रत्येक व्यक्तीने भाषेच्या विकासासाठी प्रयत्न करायला हवेत मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने प्रत्येक व्यक्ती मराठी भाषेविषय आपले प्रेम, मत व आवड सोशल मीडियाच्या माध्यमातून आणि शाळा महाविद्यालयातून कार्यक्रमातून पाहायला मिळते आणि त्यामुळे भाषा जिवंत राहते, समृद्ध होते. कुसुमाग्रजांचा जन्मदिन हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो मराठी भाषेची महती,  जोपासण्याचे व विद्यार्थ्यांनी शब्दसंपदा वाढवण्याचे आवाहन प्रमुख वक्ते यांनी केले असे मत त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अनुक्रमे कु. मोहिनी  अंचलिया व डॉ. बी. एन. कांबळे यांनी केले कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

